RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - २१] गुरुवार ते बुधवार, मे २१ - २७, २०२६ / वैशाख ३१ ते ज्येष्ठ ६, शके १९४८ [पृष्ठे-३०७

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा सातारा

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११, पोट-कलम (१) *अन्वये*

प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक भूसं/कावि-१३३/ई-२६३०६३९/२०२६.—ज्याअर्थी, मौजे बोडकेवाडी, तालुका फलटण, जिल्हा सातारा एस.आर. क्रमांक ९२२/२०२५ येथील जमिनीचे संपादन करणेच्या संबधांत भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(झ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ऐ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्हाधिकारी, सातारा यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११, पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार जिल्हाधिकारी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ४, सातारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा सातारा, तालुका फलटण, गाव बोडकेवाडी

अ.क्र.	गट/सर्व्हे क्रमांक	अंदाजित क्षेत्र	दिशा			
		(हे.आरमध्ये)	पूर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१.	३१०/१, ३१०/२/१, ३१०/२/२.	०.४०	गट नं. ३११	गट नं. ३०९	गट नं. ३०३, ३०४, ३०५.	गट नं. ३२३
	एकूण क्षेत्र	**०.४०**				

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- धोम बलकवडी प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- धोम बलकवडी प्रकल्प उजवा कालवा, गिरवी वितरिका क्र. १, सा.क्र. ११३/४७० वरील लघुवितरिका क्र. २.

समाजाला मिळणारे लाभ :- अ) धोम बलकवडी प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुका ४३०० हेक्टर, फलटण तालुका १२७५० हेक्टर व पुणे जिल्ह्यातील भोर तालुका १०५० हेक्टर या दुष्काळी क्षेत्रास सिंचनलाभ होणार आहे.

ब) सदर प्रकल्पामुळे सतत अवर्षणग्रस्त असणाऱ्या भोर, खंडाळा व फलटण तालुक्यांना पाण्याचा लाभ होऊन सुमारे एकूण १८१०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येऊन शेतीला पाणी मिळणार आहे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे प्रस्तावित संपादनामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही.

अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.६२/अ-३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ अन्वये धोम बलकवडी प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त झाली असून, त्यावेळी पर्यावरण आघात अभ्यास (Environment Impact Analysis) झाला असल्याने नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* खालील परंतुकामधील तरतुदीच्या अनुषंगाने धोम बलकवडी प्रकल्पास उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील प्रकरण-दोनमध्ये नमूद सामाजिक परिणाम निर्धारण (Social Impact Assessment) ची आवश्यकता नसल्याने त्यापासून सूट देणेत आलेली आहे.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- निरंक.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- प्रश्न उदभवत नाही.

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :- प्रश्न उदभवत नाही.

टीप :- उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ४, सातारा (भूसंपादन भवन, सदर बझार, जिल्हा कोषागार कार्यालय समोर) यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे पोट-कलम *(१)* खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ४, सातारा भूसंपादन भवन, सदर बझार, जिल्हा कोषागार कार्यालयासमोर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

संतोष चंद्रकांत पाटील (भा.प्र.से.),

सातारा, २० फेब्रुवारी २०२६. जिल्हाधिकारी, सातारा.

जिल्हा सोलापूर

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१) नुसार

अधिसूचना

क्रमांक भूसंपादन/कार्या-१/एसआर-०४/२०१७/आरआर-१४४९/२०२६.—ज्याअर्थी, भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक १, सोलापूर यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजनी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना क्र. २०२४/उविअक्र. १/भूसंपादन/एसआर-४/२०१७/आरआर-२२१/२०२५, दिनांक १० मार्च २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली असून सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात, भाग एक--पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जून १२-१८, २०२५ रोजी, पृष्ठे १५-१८ वर प्रसिद्ध झालेली आहे आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक १, सोलापूर यांचेकडे कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये कोणत्याही खातेदारांने संपादनाबाबत आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १, सोलापूर यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा सोलापूर, तालुका बार्शी, गाव बार्शी (ग्रामीण)

अ.क्र.	गट नंबर	क्षेत्र (हे.आर)
१	२	३
१.	१००५ पै.	०.०१.८३
२.	१००६ पै.	०.०८.९३
३.	१००७ पै.	०.१२.७७

अनुसूची - एक--*चालू*

१	२	३
४.	१०११ पै.	०.१५.१३
५.	१०१३ पै.	०.१२.०६
६.	१०१४ पै.	०.२८.२०
७.	१०१५ पै.	०.१२.३७
८.	१०१६ पै.	०.०८.८७
९.	१०१७ पै.	०.०५.८७
१०.	१०१८ पै.	०.४१.७२
११.	१०५१ पै.	०.०२.८०
१२.	१०५२ पै.	०.२९.७०
१३.	१०५३ पै.	०.२४.९४
१४.	१०५४ पै.	०.१५.६५
१५.	१०५५ पै.	०.०५.०६
१६.	१०५६ पै.	०.०६.४१
१७.	१०५७ पै.	०.०६.८८
१८.	१०५८ पै.	०.०३.३५
१९.	१०६० पै.	०.०५.२६
२०.	१०६१ पै.	०.७४.७५
२१.	१०६२ पै.	०.०७.०४
२२.	११९७ पै.	१.२६.५२
२३.	११९९/२ पै.	०.५५.८०
२४.	११९९/३ पै.	०.३३.५३
२५.	११९९/४ पै.	०.००.८०
२६.	१२०३ पै.	०.७७.४५
२७.	१२०४ पै.	०.७४.१०
२८.	१२१० पै.	०.१६.९७
२९.	१२०६ पै.	०.४९.३०
३०.	१२४५ पै.	०.२३.२५
३१.	१२४६ पै.	०.०९.४७
३२.	१२९७/१ पै.	०.२२.२०
३३.	१२२२ पै.	०.०७.८१

अनुसूची - दोन

प्रकल्पाचे नाव :-- बार्शी उपसा सिंचन योजना, टप्पा २, उजवा कालवा, कि.मी. सा. क्र. ७/०० ते १०/०० प्रकल्पाचे विवरण.

बार्शी उपसा सिंचन योजना, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर या योजनेमध्ये उजनी जलाशयामधून भीमा-सिना जोड कालव्याद्वारे सिना नदीवरील रिधोरे को. प. बंधारा येथून दोन टप्प्यात कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. योजनेच्या एकूण पाणी वापर २.५९ अघफू असून प्रकल्पाचे एकूण पीक क्षेत्र बार्शी तालुक्यातील वीस गावांतील १७८२० हे. व माढा तालुक्यातील पाच गावांतील ३४८० हेक्टर असे एकूण २१३००० हे. आहे.

पंपगृह टप्पा-१ हे मौजे रिधोरे, तालुका माढा येथे असून या टप्प्यासाठी १३७५ अश्वशक्तीचे ४ पंप प्रस्तावित आहेत. उर्ध्वगामी नलिका टप्पा-१ ही दोन रांगा असून लांबी १०.०८ कि.मी. आहे व त्यास १७०० मि.मी. इतका आहे. टप्पा-१ चे वितरण कुंड मौजे उपळाई (ठोंगे) येथे आहे. वितरण कुंड टप्पा-१ पासून मुख्य कालवा व डावा कालवा निघत असून मुख्य कालव्याची लांबी ९. ६० कि.मी. व डाव्या कालव्याची लांबी १२.७५ कि.मी. आहे.

पंपगृह टप्पा-२ हे मौजे लक्ष्याचीवाडी, तालुका बार्शी येथे कालव्याची शेवटी सा. क्र. ९.६० कि.मी. येथे असून या टप्प्यासाठी ३२० अश्वशक्तीचे ४ पंप प्रस्तावित आहेत. उर्ध्वगामी नलिका टप्पा-२ ही दोन रांगा असून लांबी १.०९५ कि.मी. आहे व त्यास १३०० मि.मी. इतका आहे. टप्पा-१ चे वितरण कुंड मौजे उपळाई (ठोंगे) येथे आहे. वितरण कुंड टप्पा-२ पासून उजवा कालवा निघत असून त्या कालव्याची लांबी ५४ कि.मी. आहे.

या योजनेद्वारे बार्शी तालुक्यातील २० गावांतील १२५५० हेक्टर व माढा तालुक्यातील ५ गावांतील २४५० हेक्टर क्षेत्र सिंचन क्षेत्र निर्मिती होणार आहे.

सामाजिक फायदे :-- बार्शी व माढा तालुक्यातील हा भाग कायम दुष्काळाच्या छायेत असून येथे सिंचनाच्या सोयी नाहीत. त्यामुळे सदर प्रकल्प लवकर पूर्ण करण्याबाबत या भागातील जनता व लोकप्रतिनिधी अत्यंत आग्रही आहेत. विषयांकित भूसंपादन प्रस्ताव उजवा कालवा कि.मी. ७ च्या कामासाठीचा असून या उजव्या कालव्याचे काम पूर्ण झाल्यास अवर्षण प्रवण अशा बार्शी व माढा तालुक्यातील ८७०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी होणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्प या भागासाठी वरदान ठरणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा सोलापूर, तालुका बार्शी, गाव बार्शी (ग्रामीण)

अ.क्र.	गट नंबर	क्षेत्र (हे.आर)
निरंक	निरंक	निरंक

पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही, सबब माहिती निरंक.

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

बार्शी उपसा सिंचन योजना टप्पा २, उजवा कालवा कि.मी. सा. क्र. ७/०० ते १०/०० चे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाचे अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० *(क)* नुसार प्रस्तावास पूर्वलक्ष्मी प्रभावाने SIA सूट देता येऊ शकत नाही असे अवर सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांनी त्यांचेकडील पत्र संकीर्ण-२०२५/ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये अवगत केले आहे प्रस्तुत प्रकल्पाचे अलाहिदा काम पूर्ण झाले असल्याने उक्त नियमाचे कलम १० *(क)* नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट घेण्याची आवश्यकता नाही असे मानण्यात येत आहे.

टीप :-- उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक १, सोलापूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

एस. कार्तिकेयन (भा.प्र.से.),

सोलापूर, ८ मे २०२६. जिल्हाधिकारी, सोलापूर.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांजकडून

वाचा :-- १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ).*

२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेश क्र. नपसू-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

३) मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद यांचा दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजीचा प्रस्ताव.

४) जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील क्र. COLPN३४०१८(११)/३०/Nagarpalika/१५०४०१६/२०२५, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५.

५) जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र. COLPN३४०१८(११)/३०/२०२५-Nagarpalika/१८५२८९४/२०२६, दिनांक १८ एप्रिल २०२६.

अधिसूचना

क्रमांक जेनपा/७/उपविधी/कावि-१४३/२०२६.— ज्याअर्थी,महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(२)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार जेजुरी नगरपरिषेदेने जेजुरी शहरात येणाऱ्या वाहनांवर प्रवेशकर आकारणी करणेकामी केलेल्या "जेजुरी नगरपालिका वाहन प्रवेश कर वसुली उपविधी २०२५" च्या मसुद्यास मान्यता देणेसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* नुसार उपविधी तयार केले आहेत.

नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी नगरपरिषदेस महाराष्ट्र अधिनियम, १९६५ चे कलम १०८ *(अ)* व *(ब)* अन्वये विविध कर बसवता येतात. त्या अनुषंगाने जेजुरी शहरात देवदर्शनासाठी येणाऱ्या वाहनांवर प्रवेश कर आकारणी करणेकरिता उपविधी तयार करणेसाठी प्रशासक, जेजुरी नगरपरिषद यांच्या कडील ठराव क्र. १६४, दिनांक १ जुलै २०२४ अन्वये मंजुरी देणेत आली आहे, तसेच उपविधीबाबतचा मसुदा तयार केल्यानंतर मसुद्यास प्रशासक, जेजुरी नगरपरिषद यांच्याकडील ठराव क्र. १८३, दिनांक २२ ऑगस्ट २०२४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर प्रारूप उपविधीचा मसुदा दिनांक ४ सप्टेंबर २०२४ ते दिनांक २५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत नागरिकांना पाहण्यासाठी, तसेच सूचना व हरकती घेणेकरिता जाहीर नोटिस प्रसिद्धीकरण दैनिक सकाळ वृत्तपत्र, जेजुरी नगरपरिषदेचे नोटिस बोर्ड, जेजुरी नगरपरिषदेचे फेसबुक पेज: http://www.facebook.com/share/p/cgGpxYMcLY७giMTb/?mibextid-xfxF२! इत्यादीवर प्रसिद्ध करण्यात आला होता.

तथापि, दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजीचे जाहीर नोटिसेप्रमाणे विहित मुदतीत (२१) दिवसांच्या आत नगरपरिषदेकडे कोणतीही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (क)* मधील तरतुदीनुसार प्रशासक, जेजुरी नगरपरिषद यांनी ठराव क्र. २२४, दिनांक २७ सप्टेंबर २०२५ अन्वये उपविधीचे प्रारूप मसुद्यास अंतिम मान्यता देणेत आली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधी छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)*, ३२२ *(३) (क),* ३२२ *(३) (ड)* मधील तरतुदीनुसार मला प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे जेजुरी नगरपरिषदेच्या "जेजुरी नगरपालिका वाहन प्रवेश कर वसुली उपविधी २०२५" यास मंजुरी देत आहे, तसेच सदरचे उपविधी राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून अमलात येतील.

जेजुरी नगरपरिषद वाहन प्रवेश कर उपविधी - २०२५

श्री क्षेत्र जेजुरी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे आणि येथे दरवर्षी प्रमुख १० यात्रा आयोजित केल्या जातात. प्रत्येक वर्षी अंदाजित किमान ३ लाख भक्त श्री खंडोबा देवाच्या पूजनासाठी जेजुरीस येतात. प्रत्येक यात्रेच्या कालावधीत अंदाजित किमान ७५,००० भाविक शहरात येतात, तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आषाढी वारी दरम्यान एक दिवसीय मुक्कामासाठी जेजुरीत थांबते. जेजुरी शहरामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या प्रमुख यात्रांचा तपशील पुढीलप्रमाणे.

अनु. क्र.	यात्रेचा तपशील	यात्रेबाबत थोडक्यात माहिती
१	२	३
१.	पौष पौर्णिमा	सदर यात्रेमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व इतर भागातून जेजुरी शहरामध्ये गाढवांचा व घोड्यांचा परंपरागत खरेदी विक्री बाजार भरतो त्यामध्ये परराज्यातून गाढव खरेदी विक्रीकरिता अनेक व्यापारी, तसेच देवदर्शनासाठी भाविक येत असतात.

अनु. क्र.	यात्रेचा तपशील	यात्रेबाबत थोडक्यात माहिती
१	२	३
२.	माघ पौर्णिमा	सदर यात्रेमध्ये सर्व समाजाचे, तसेच कोकण व मुंबई भागातील कुलदैवतांच्या पालख्या व शिखर काठ्या घेऊन भाविक देवाच्या भेटीसाठी येत असतात.
३.	महाशिवरात्री	महाशिवरात्रीचे दिवशी खंडोबा मंदिर या ठिकाणी असणारे गाभाऱ्याच्या आतील भागात जमिनीत असणारे गुप्त लिंगाचा दरवाजा, तसेच मंदिराच्या शिखरावरील लिंगाचे मंदिर उघडले जाते. या वेळी दर्शन घेणेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक येत असतात.
४.	जानाईदेवी पालखी सोहोळा	जेजुरी शहराची ग्रामदेवी श्री. जानाईदेवी पायी पालखी सोहोळा जेजुरी ते निवकणे (सातारा) या ठिकाणी आयोजित केला जातो.
५.	प्रत्येक शनिवार व रविवार	जेजुरी हे महाराष्ट्रातील सर्व समाजाचे कुलदैवत असल्याने शनिवार व रविवारी सुट्टीचे दिवशी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी असते.
६.	चैत्र पौर्णिमा	सदर यात्रे दिवशी कुलाचार, कुलधर्म करणेचा व यात्रेचा काळ असलेने सर्व भागातून भाविक जागरण गोंधळ, पूजाअर्चा करणेसाठी मुक्कामी येत असतात.
७.	श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहोळा.	श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी जेजुरी शहरामध्ये आषाढीवारी दरम्यान एक दिवसाच्या मुक्कामासाठी असते.
८.	दसरा	जेजुरी शहरामध्ये घटस्थापनेपासून दसरा या दिवशीपर्यंत म्हणजे १० दिवस दररोज अनेक भाविक व ग्रामस्थ दर्शनासाठी येतात व दसऱ्याचे दिवशी श्री खंडोबा मंदिर व कडेपठार मंदिर या ठिकाणी मोठया प्रमाणावर पालखी सोहळ्याचा कार्यक्रम रमणा कडेपठार मंदिराच्या मागील बाजूस मध्यरात्रीच्या वेळी साजरा होत असतो.
९.	दिवाळी	सदर कालावधीमध्ये शालेय सुट्टी असल्याने, तसेच नवीन लग्न झालेले नवदाम्पत्य व नातेवाईक कुलधर्म कुलाचार करणेकामी महाराष्ट्र व परराज्यातील भाविक मोठ्या प्रमाणावर येत असतात.
१०.	चंपाषष्ठी	चंपाषष्ठी हा एक प्रमुख धार्मिक सोहळा असून या वेळी श्री खंडोबा देवाचे पूजन केले जाते.

भाविकांची सदर यात्रेदरम्यान व सुट्टीचे दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असलेने शहरातील सेवा जसे की स्वच्छता, रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा, अग्निशमन सेवा पुरविणेसाठी मोठा ताण पडतो. या सेवांचा खर्च मोठ्या प्रमाणावर असलेने केवळ मालमत्ता कर आणि पाणी कर या नगरपरिषदेचे उत्पन्नातून भागवणे शक्य होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३२२ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून जेजुरी नगरपरिषद, जिल्हा पुणे, श्री खंडोबा देवस्थान, जेजुरी येथील परिसरात प्रवेश करणाऱ्या वाहनांवर वाहन प्रवेश कर आकारणीसाठी पुढील नियम बनवित आहे.

१. शीर्षक :-- हा नियम जेजुरी नगरपरिषद वाहन प्रवेश कर संकलन नियम, २०२५ म्हणून ओळखला जाईल.

२. परिभाषा :-- अ) रहिवाशी : जेजुरी शहरामध्ये राहणारा व व्यवसाय करणारा किंवा तेथून उत्पन्न मिळवणारा आणि ज्याचे / जिचे आधार कार्डवरील रहिवासाचा पत्ता जेजुरी शहरातील आहे.

आ) प्रवेश कर आकारला जाणारे वाहन : जेजुरीमध्ये दर्शनासाठी येणारी खाजगी वाहने.

१) लहान वाहन : आठ आसनांपर्यंत क्षमता असलेली वाहने, दुचाकी वगळता.

२) मोठी वाहने : आठ किंवा त्याहून अधिक आसन क्षमता असलेली वाहने.

३) अवजड वाहने : ट्रक, ट्रेलर, टेम्पो, ट्रॅक्टर आणि त्यासारखी वाहने.

इ) नगरपालिकेची सीमा : जी हद्द २०२० च्या संयुक्त विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार अथवा जेजुरी नगर परिषदेने शासनाच्या मान्यतेनुसार वेळोवेळी निर्धारित केलेली हद्द.

ई) प्रवेश कर : भक्तांची वाहने प्रवेश करत असताना आकारला जाणारा कर हा कर फक्त वाहन प्रवेशावर लागू होतो, त्यात वाहन पार्किंग समाविष्ट नाही आणि वाहनात असलेल्या भक्तांची संख्या यावर आधारित नाही.

उ) परिशिष्ट : या नियमांसोबत जोडलेले परिशिष्ट.

ऊ) मुख्याधिकारी : महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार मुख्याधिकारी म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती.

ए) नगरपरिषद निधी : महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९० नुसार परिभाषित.

३. कर दर ठरविण्याचा अधिकार :-- जेजुरी नगरपरिषद प्रवेश कराचा दर वेळोवेळी ठरविण्याचा अधिकार राखून ठेवेल, जो परिशिष्ट-एकमध्ये स्तंभ क्र. ४ मध्ये दिला आहे.

४. प्रवेश करातून सूट :--पुढील वाहनांस प्रवेश करात सूट दिली जाईल.

सर्व दुचाकी वाहने,

सर्व रुग्णवाहिका,

सर्व शासकीय, निमशासकीय वाहने,

जेजुरी नगरपरिषद क्षेत्रातील रहिवासी,

श्री मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त,

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची वाहने.

५. कराची पावती :-- कर भरल्यानंतर कर संकलक वाहनधारकास नगरपरिषदेने ठरवून दिलेल्या दरानुसार पावती देईल.

६. पावती राखणे :-- वाहनधारकाने प्रवेश करताना प्राप्त केलेली पावती जतन करावी.

७. संकलन प्रक्रिया :-- वाहन प्रवेशकर संकलन जेजुरी नगरपरिषद द्वारा दर्शविलेल्या ठिकाणीच केला जाईल. वाहन प्रवेश कर संकलनाची प्रक्रिया वेळोवेळी निश्चित केली जाईल. सदर ठिकाणी नगरपरिषदेने ठरवून दिलेले दर फलक प्रसिद्ध करण्यात येईल. हा कर नगरपरिषद स्वत: कर्मचारीमार्फत किंवा याकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४९-अ अंतर्गत अभिकरणाकरवी वसूल करेल.

८. सूट असलेले वाहनधारकांचे घोषणापत्र :-- सूटसाठी पात्र असलेल्या वाहनधारकाने कर संकलकाद्वारे दिलेल्या घोषणापत्रामध्ये माहिती भरावी. कर संकलकाने संपूर्ण भरलेले घोषणापत्र करविभाग प्रमुख यांना सादर करावे. सूटबाबत पात्र/अपात्रेचा निर्णय करविभाग प्रमुख यांनी घोषणापत्र प्राप्त झालेपासून पुढील एक दिवसात घ्यावयाचा आहे.

९. दंड :-- जो वाहनधारक नियम क्र. ४ चा उल्लंघन करतो आणि वाहन प्रवेश कर टाळतो त्याला रुपये २०० चा दंड आकारला जाईल. या दंडाबाबत वेळोवेळी नगरपरिषद सर्वसाधारण सभा बदल करेल.

१०. निधीचा विनियोग :-- सदर वाहन प्रवेशकरापासून दंडासह मिळणारे उत्पन्न हे जेजुरी नगरपरिषद निधीमध्ये जमा केले जाईल, तसेच निधीची विनियोग प्रक्रिया महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, २०११ मधील तरतुदीप्रमाणे केली जाईल.

प्रवेश कर संकलनासाठी परिशिष्ट

स.न.	कराचे नाव	कर लागू होणारे वाहन	कर रक्कम	करातून सूट	शेरा
१	२	३	४	५	६
१.	वाहन प्रवेश कर	श्री खंडोबा पूजनासाठी जेजुरीमध्ये येणारी वाहने.	१) लहान वाहने (आठ आसनांपर्यंत क्षमता असलेली वाहने) - रुपये ६०.	- सर्व दुचाकी वाहने, - सर्व रुग्णवाहिका, - सर्व शासकीय, निम.	हा एक प्रवेश कर आहे. वाहन पार्किंगशी संबंधित नाही. हा पार्किंग कर नाही.
			२) मोठी वाहने (बस, मिनी बस, टेम्पो, ८ आसनांपेक्षा जास्त) - रुपये ८०.	शासकीय वाहने, - जेजुरी नगरपरिषद. क्षेत्रातील रहिवासी, श्री मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त.	

प्रवेश कर संकलनासाठी परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६
			३) ट्रक, ट्रेलर, टेम्पो, ट्रॅक्टर आणि त्यासारखी वाहने - रुपये ८०.	महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची वाहने.	

डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
पुणे, १२ मे २०२६. पुणे विभाग, पुणे.

BY DIVISIONAL COMMISSIONER AND REGIONAL DIRECTOR

क्रमांक जेनपा/७/उपविधी/कावि-१४३/२०२६.—Shri Kshetra Jejuri is an important pilgrimage site for devotees in Maharashtra and 10 major pilgrimages are organized here every year. Every year, about 3 lakh devotees come to Jejuri to worship Lord Shri Khandoba. During each yatra about 75,000 devotees come to the city. Also the palanquin of Shri Saint Dnyaneshwar Maharaj stops in Jejuri for a days stay during Ashadhi Wari. The details of the major pilgrimages organized in Jejuri are as follows.

Jejuri Municipal Council Vehicle Entry Tax Bye-law 2025

Sr.No.	Details of the Pilgrimage	Brief Information about the Pilgrimage
1	2	3
1.	Paush Pournima	Every year a livestock market for equines is organized during this pilgrimage. Traders from Maharashtra, Karnataka, Gujarat and other parts of the country visit this market for equines and devotees visit Jejuri for worshipping Lord Shri Khandoba.
2.	Magh Pournima	During this pilgrimage, palanquins and shikhar sticks of the deities of communities from the Konkan and Mumbai Region come to pay homage.
3.	Mahashivratri	On the day of Mahashivratri, the doors of the hidden Ling located in the ground inside the Temple Complex of Khandoba Temple as well as the Ling Temple on the top of the Temple are opened. Devotees from all over Maharashtra come to seek blessings.
4.	Janaidevi Palkhi Ceremony.	The palanquin of the village goddess Shri Janaidevi of Jejuri City is carried on foot from Jejuri to Niwakane (Satara).
5.	Every Saturday and Sunday.	Since Jejuri is the ancestral deity of Maharashtra, the place is crowded with the devotees on weekends.
6.	Chaitra Pournima	On this day of the pilgrimage, devotees from all the places come to stay and perform rituals.
7.	Sant Dnyaneshwar Maharaj Palkhi Procession.	The palanquin of Shri Saint Dnyaneshwar Maharaj stops in Jejuri for a day's stay during Ashadhi Wari.
8.	Dussehra	In Jejuri City from Ghatasthapana to Dussehra that is for 10 days, many devotees and villagers come every day. On Dussehra a large-scale palanquin ceremony is held at Shri Khandoba Temple and Kadepathar Temple.

Sr.No.	Details of the Pilgrimage	Brief Information about the Pilgrimage
1	2	3
9.	Diwali	Being a period of vacation students, newlyweds from Maharashtra and other states come to perform family rituals.
10.	Champashashthi	Champashashthi is a religious festival where lord Khandoba is worshipped.

The city's basic services such as cleanliness, street light maintenance, water supply management and fire safety are burdened during above pilgrimages. As the cost of providing these services is high, these services cannot be sustained solely through the revenue generated from property tax and water charges. Hence, under the authority bestowed by Section 322 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, the Jejuri Municipal Council, District Pune, hereby frames the following bye-law for the imposition of Vehicle Entry Tax on vehicles entering the jurisdiction of Jejuri Municipal Council for visiting Shri Lord Khandoba Devasthan.

1. Short Title :-- This bye-law may be cited as the Jejuri Municipal Council Vehicle Entry Tax Bye-law, 2025.

2. Definitions :-- a) Resident :– Any person residing in Jejuri City, earning income from Jejuri or carrying on business in Jejuri and whose Aadhaar Card is registered with a Jejuri address.

b) Vehicles subject to Entry Tax :– Private vehicles used by devotees entering the city for the purpose of worship.

1) **Small Vehicles :–** Vehicles having a seating capacity up to eight seats, excluding two-wheelers.

2) **Large Vehicles :–** Vehicles having more than eight seats.

3) **Heavy Vehicles :–** Trucks, Trailers, Tempo, Tractors and similar vehicles.

c) Municipal Council Boundary :– The area demarcated as per the Jejuri City Development Plan under the Unified Development Control and Promotion Regulations, 2020 (UDCPR) or as revised by Jejuri Municipal Council with prior approval of State Government.

d) Entry Tax :– A tax levied on vehicles transporting devotees. This tax is applicable solely to vehicles and does not include vehicle parking charges. It is also not dependent on the number of passengers in the vehicle.

e) Appendix :– Refers to the Appendix attached to these Bye-laws.

f) Chief Officer :– The person appointed or deemed to be appointed as per the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 to serve as Chief Officer of the municipal area.

g) Municipal Fund :– As defined under Section 90 of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965.

3. Authority to Fix Tax Rate :– Periodically Jejuri Municipal Council shall have the authority to determine the rate of Entry Tax, as specified in Column No. 4 of Appendix 1.

4. Exemptions from Entry Tax :– Entry Tax shall be exempt for :–

- All two Wheelers,
- All Ambulances,
- All Government, Semi-Government Vehicles,
- Residents of Jejuri Municipal Council area,
- Trustees of Shri Martand Devsansthan, Jejuri.
- Vehicles of Maharashtra State Road Transport Corporation.

5. Tax Receipt :– Upon payment, the taxpayer shall be issued a receipt by the tax collector. Receipt shall be in accordance with rates as decided by the Jejuri Municipal Council.

6. Receipt Preservation :– The vehicle owner must retain the vehicle entry tax receipt upon entering the city.

7. Collection Process :– The Tax shall be collected at locations designated by the Jejuri Municipal Council. These locations shall have boards displaying rates decided by the Jejuri Municipal Council. The process of collection will be determined from time to time. Tax collection may be executed by Municipal Council staff or an authorized agency, as per Section 49-A of the Maharashtra Municipal Councils, Nagar-panchayats and Industrial Townships Act, 1965.

8. Declaration by Exempt Vehicle Owners :– Vehicle owners eligible for exemption must complete a declaration form provided by the tax collector. The completed declaration form shall be forwarded by the vehicle tax collector to the head of tax department of Jejuri Municipal Council. The head of tax department will take decision on exemption within one day on receiving such declaration.

9. Penalty :– Any vehicle owner who violates Bye-law No. 4 and evades tax payment shall be liable to a fine of Rs. 200. The fine shall be periodically revised by the Jejuri Municipal Council.

10. Fund Appropriation:– Income from Vehicle Entry Tax shall be deposited in the Jejuri Municipal Council Fund. Appropriation of these funds will be in accordance with the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, and the Maharashtra Municipal Account Code, 2011.

Appendix - 1

Sr. No.	Tax Name	Type of Taxable Vehicle	Tax Amount	Tax Exemptions	Remarks
1	2	3	4	5	6
1.	Vehicle Entry Tax.	Vehicles entering Jejuri for worship of Lord Khandoba.	1) Small Vehicles (seating capacity up to Eight Seats) Rupees 60. 2) Large Vehicles (Buses, Mini-Buses, Tempos - More than 8 seats) Rupees 80. 3) Heavy vehicles: Trucks, Trailers, Tempo, Tractors and similar vehicles Rupees 80.	- All two Wheelers, - All Ambulance, - All Government, Semi-Government Vehicles, Residents of Jejuri Municipal Council Area. - Trustees of Shri Martand Dev Sansthan, Jejuri. - Vehicles of Maharashtra State Road Transport Corporation.	This is an entry tax only. It does not apply to Vehicle parking. It is not a parking tax.

DR. CHANDRAKANT PULKUNDWAR (I.A.S.),
Divisional Commissioner and Regional Director,
Pune Region, Pune.

Pune, 12th May 2016.

संचालक, नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

आदेश

क्रमांक डी.टी.पी./वि.यो.पंढरपूर/कलम-१२७(२)/आदेश/टीपीव्ही-१/२११०/२०२६.— ज्याअर्थी, पंढरपूर नगरपरिषदेची वाढीव हद्दीची दुसरी सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१७९७/१०३४/प्र.क्र.५८/९७/अ/नवि-१३, दिनांक १६ फेब्रुवारी २००० अन्वये मंजूर केली असून, ती विकास योजना दिनांक ३१ मार्च २००० पासून अमलात आलेली आहे (यात यापुढे "उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजना" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेमध्ये, मौजे इसबावी येथील सर्व्हे क्र. १२१/१/अ/२ व सर्व्हे क्र. १२२/१/अ/१ ही जमीन (यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) आरक्षण क्र. १०, "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" यासाठी आरक्षित असून (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिलेले आहे), सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण, नगरपरिषद, पंढरपूर आहे (यात यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजना अमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनी संपादन केलेल्या नाहीत ;

आणि ज्याअर्थी, संबंधित जमीन मालकांनी (यात यापुढे "उक्त जमीनमालक" असे संबोधिले आहे) उक्त जमिनींपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणासाठी उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* चे तरतुदीनुसार दिनांक २१ फेब्रुवारी २०११ रोजीची सूचना उक्त समुचित प्राधिकरणावर बजावलेली असून (यात यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) ती उक्त समुचित प्राधिकरणास दिनांक २१ फेब्रुवारी २०११ रोजी प्राप्त झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना उक्त समुचित प्राधिकरणास प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, १२ महिन्यांच्या विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा, उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ *(१)* मधील तरतुदींनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पंढरपूर यांनी पत्र क्र. १९६१/२०२५, दिनांक १६ एप्रिल २०२५ अन्वये, सदर प्रकरणी अहवाल सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा, सोलापूर यांनी पत्र क्र. ६९६, दिनांक ५ जून २०२५ अन्वये व सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी पत्र क्र. ९२५, दिनांक २ जुलै २०२५ अन्वये उक्त जमीनमालक यांनी बजावलेल्या उक्त सूचनेंतर्गतची उक्त जमीन उक्त आरक्षणातून व्यपगत झालेबाबत नमूद करून उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वयेची अधिसूचना निर्गमित करणेबाबत अहवाल सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजनासंबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीवरील उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीनुसार निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :--

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा	उक्त जमिनींचा तपशील	मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील कलम १२७ *(२)* अन्वये व्यपगत झालेल्या आरक्षणाचा तपशील व क्षेत्र
१	२	३	४
१.	पंढरपूर नगरपरिषद, मौजे इसबावी, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर.	सर्व्हे क्र. १२१/१/अ/२ व सर्व्हे क्र. १२२/१/अ/१.	आरक्षण क्र. १०, "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" (क्षेत्र ४२९२ चौ.मी.).

टीप :--

१. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीन मालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

२. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

३. उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

४. सदर आदेश संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, २३ एप्रिल २०२६.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

ORDER

No. D.T.P/D.P.Pandharpur/Sec.-127*(2)*/Order/TPV-1/2110/2026.—Whereas, the Second Revised Development Plan of Pandharpur Municipal Council Extended Area has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1797/1034/CR-58/UD-13, dated 16th February 2000 and came into force with effect from dated 31st March 2000 (hereinafter referred to as "the said Sanctioned Second Revised Development Plan") ;

and whereas, in the said sanctioned Second Revised Development Plan, the land bearing Survey No. 121/1/A/2 and Survey No. 122/1/A/1 of Mouje Isbavi (hereinafter referred to as "the said Land") is affected by the Reservation Site No. 10, "Primary School and Playground" (hereinafter referred to as "the said Reservation") and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Pandharpur (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

and whereas, the land under the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (Ten) years from the date on which the said Sanctioned Second Revised Development Plan came into force ;

and whereas, the concerned land owners (hereinafter referred to as "the said Land Owners") of the said land under the said Reservation has served a notice under Section 127 *(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice"), on the said Appropriate Authority on dated 21st February 2011 and the said Appropriate Authority has received the said Notice on dated 21st February 2011 ;

and whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period of 12 months after receipt of the said Notice ;

and whereas, the Chief Officer, Municipal Council, Pandharpur *vide* letter No. 1961/2025, dated 16th April 2025 has submitted a report.

and whereas, the Assistant Director of Town Planning, Solapur Branch, Solapur *vide* letter No. 696, dated 5th June 2025 and the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune *vide* letter No. 925, dated 2nd July 2025 has stated that, in regards with the said Notice, the said Reservations on the said land has been lapsed and accordingly has submitted a report for issuance of Notification as per the provisions of Section 127 *(2)* of the said Act ;

and whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by it under Section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagarpanchayats and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

and whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the Order as per the provisions of Section 127 *(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land ;

Now therefore, under Section 127 *(2)* of the said Act, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this Order notifies that, the said Reservation in the said Sanctioned Second Revised Development Plan on the said Land has been lapsed as specified in the following Schedule and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Second Revised Development Plan, as follows :—

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouje, Taluka and District	Description of the Land	Area and Details of Reservation lapsed under Section 127 *(2)* from the Sanctioned Second Revised Development Plan
1	2	3	4
1.	Pandharpur Municipal Council, Village Isbavi, Taluka Pandharpur, District Solapur.	Survey No. 121/1/A/2 and Survey No. 122/1/A/1.	Site No.10, “Primary School and Playground” Area = 4292 sq.mtrs.

Note :–

1. Before certifying the part plan in pursuance of the said Order, the concerned Land Owner shall be required to submit an updated and certified demarcation map from Land Records Department of his land under the Notice.
2. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.
3. A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Pandharpur, Taluka Pandharpur, District Solapur during office hours on all working days for inspection to public upto one month.
4. This Order shall also be published on **www.dtp.maharashtra.gov.in**

JITENDRA LAXMANRAO BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 23rd April 2026.

महापालिका आयुक्त यांजकडून

पुणे महानगरपालिका, पुणे

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये

जाहीर प्रकटन

क्रमांक पुणे मनपा/झोन-६/३६३/२०२६.—पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या मे. शासन अधिसूचना अधिनियम ३१, क्रमांक टीपीएस-१८१५/२०९/६९/१५/D.P.PUNE/Sanction/UD-१३, दिनांक ५ जानेवारी २०१७ अन्वये मान्यता प्राप्त विकास आराखड्यातील महानगरपालिका सभा ठराव क्र. ३१५, दिनांक २० डिसेंबर २०२३ नुसार खाली दर्शविल्याप्रमाणे बदल करण्याचा पुणे महानगरपालिका विचार करीत आहे.

अ.क्र.	पेठ	पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या सन २०१७ च्या मंजूर विकास आराखड्यातील तरतूद	नियोजित फेरबदल
१	२	३	४
१.	सदाशिव	पुणे पेठ सदाशिव येथील मान्य विकास आराखडा २०१७ मध्ये दक्षिणोत्तर खजिना विहीर चौक ते खुन्या मुरलीधर चौक व क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके रस्ता २४.०० मी. रुंद दर्शविलेला आहे.	पुणे पेठ सदाशिव येथील मान्य विकास आराखडा २०१७ मध्ये दक्षिणोत्तर खजिना विहीर चौक ते खुन्या मुरलीधर चौक व क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके रस्ता २४.०० मीटर रुंदी ऐवजी १५.०० मीटर रुंद करणेबाबत.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये नोटिस देण्यात येते कि, वरील बदलाबाबत संबंधित अथवा अन्य नागरिकांपैकी ज्या कोणास हरकत किंवा सूचना नोंदविणे असेल, त्यांनी ही नोटिस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मा. शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचेकडे ती लेखी कळवावी. फेरबदलाचा नकाशा नागरिकांना पाहण्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मा. शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयामध्ये पहिल्या मजल्यावर उपलब्ध आहे. सदर मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी व सूचनांचाच फक्त विचार केला जाईल. त्याचप्रमाणे सुचविलेल्या बदलामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांनी विनंती केल्यास त्यांचे म्हणणे मा. शहर अभियंता, पुणे महानगरपालिका हे कार्यालयीन भेटीचे वेळेत ऐकून घेतील.

विक्रम कुमार (भा.प्र.से.),
महापालिका आयुक्त,
पुणे, १५ एप्रिल २०२६. पुणे महानगरपालिका, पुणे.

BY MUNICIPAL COMMISSIONER

PUNE MUNICIPAL CORPORATION, PUNE

Issued under Clause 37 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. पुणे मनपा/झोन-६/३६३/२०२६.—As per Government Notification under Section 31, No. TPS-1815/209/69/15/DP-Pune/ Sanction/UD-13, dated 5th January 2017 of Old Pune City PMC Limits As per Pune Municipal Corporation General Body Resolution No. 315, dated 20th December 2023 the Pune Municipal Corporation intend the following minor modification in the Sanctioned Development Plan of the year 2017.

Sr. No.	Peth	Provision in Sanctioned Development Plan of Pune City Old PMC Limits of the Year 2017	Provision Planned Change
1	2	3	4
1.	Sadashiv	South-North road of Pune Peth Sadashiv from Khajina Vihir Chowk to Khunya Murlidhar Chowk and Krantiveer Vasudeo Balawant Phadke road is shown as 24.00 mtrs. wide.	South North road of Pune Peth Sadashiv from Khajina Vihir Chowk to Khunya Murlidhar Chowk and Krantiveer Vasudeo Balawant Phadke road to be shown as 15.00 mtrs. wide instead of 24.00 mtrs. wide.

The Notice under Section 37 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 is hereby issued to all the citizens ; If any citizens has any objections or suggestions to the Proposed Modification as prescribed above may communicate the same in writing to the City Engineer, Pune Municipal Corporation, Shivajinagar, Pune-5 within one month from the date of publication of this notice in Government Gazette. Objection received before the expiry of the period only be considered.

The copy of the plan showing the proposed modification is available in the office of City Engineer, 1st Floor, Pune Municipal Corporation, Pune. The citizens can visit the office in working hours to inspect the plan showing the proposed modification, if interested.

The Citizens affected due to these modifications will be heard if requested by the City Engineer during his visiting hours.

VIKRAM KUMAR (I.A.S.),
Municipal Commissioner,
Pune, 15th April 2026. Pune Municipal Corporation, Pune.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सहकलम १२ अन्वये

झोपडपट्टी निर्मूलन आदेश

क्रमांक झोपुप्रा/सप्रा-१/झोनिआ/७८२/२०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३-अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दिनांक ३० जून २००५ अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रांकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमूद सि.स.नं. ५२, शिवराम दादा तालीम, गणेश पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ८११.०४ चौ.मी. या खाजगी मालकीच्या जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे "सदर क्षेत्र" असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. पुर्णायू डेव्हलपर्स एलएलपी यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी सदर जागेवर अधिनियमाच्या कलम ३ *(क)* नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दिनांक २६ जून २०२५ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर प्रस्तावास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ *(१)* च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-दोन) तयार करून दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-दोननुसार सदर मिळकतीवर एकूण १११ झोपड्या असून त्यापैकी ५१ निवासी पात्र, ४२ निवासी अपात्र, १२ बिगर निवासी अपात्र, तर सार्वजनिक ०६ इतके झोपडीधारक आहेत ;

सदर मिळकतीकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दिनांक २६ जून २०२५ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जुलै १० - १६, २०२५, पृष्ठे ८०-८१ वर, तसेच स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व दैनिक विश्वेश्वरमध्ये दिनांक ५ जून २०२५ रोजी प्रसिद्ध करणेत आला आहे.

उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणाऱ्या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड, सहकलम १२ अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

विकसक मे. पुर्णायू डेव्हलपर्स एलएलपी यांनी सि.स.नं. ५२, शिवराम दादा तालीम, गणेश पेठ, पुणे या ठिकाणच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सर्व पात्र झोपडीधारकांना दरमाह रुपये ७,००० भाडे देऊन त्यांची तात्पुर्ती राहण्याची सोय केलेली आहे. तरी संक्रमणाची सर्व जबाबदारी ही केवळ आमची राहील, तसेच याबाबत भविष्यात काही वाद-विवाद निर्माण झाल्यास त्याचे निराकरण आम्ही करू व त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसनास कोणतीही तोशीष लागू देणार नाही असे रुपये ५०० च्या मुद्रांकावरील दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नगर रचना विभागाने संक्रमण व्यवस्थेसाठी प्रति पात्र झोपडीधारक प्रतिमाह किमान रुपये ४,७६६

इतके भाडे निर्धारित केले असून प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १०, दिनांक १२ डिसेंबर २०२३ व शुद्धिपत्रक क्र. १, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ नुसार निष्कासनापूर्वी एक वर्षाचे भाडे अग्रीम स्वरूपात व त्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा ताबा देईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस पुढील एक वर्षाचे आगाऊ भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतुदींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, सतीशकुमार खडके (भा.प्र.से), मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३-ड, सहकलम १२ *(१)* नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

आदेश :--

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रीतीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसांचे आत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तत्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(८)* अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे, तसेच इमारतीमधील सामानांची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांस राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहित मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३-झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १,००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं. ५२, शिवरामदादा तालीम, गणेश पेठ, पुणे.

पेठ गणेश पेठ, पुणे

सर्व्हे नंबर / सि.स.नं.	जमिनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ. मी.) अंशत: / पूर्णत:	चतु:सीमा	शेरा
१	२	३	४	५
सि.स.नं. ५२	खाजगी	८११.०४ चौ.मी.	पूर्वेस - लागू, सि.स.नं. १३२, १३३, १३४, १३८. पश्चिमेस - लागू, सि.स.नं. १३९. दक्षिणेस - लागू, बोळ. उत्तरेस - लागू, रस्ता व सि.स.नं. ५६.	

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, २० एप्रिल २०२६.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये अंतिम अधिसूचना

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

